0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :-

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २०/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१९/२०१३/जा.२५८, दिनांक २२/०३/२०१३, ०५/०४/२०१३ व १२/०४/२०१३.

३) तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (प्रशा.), नारपोली पोलिस स्टेशन, भिवंडी यांचेकडून दिनांक २०/०३/२०१३ प्राप्त निवेदन.

४) तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (प्रशा.), नारपोली पोलिस स्टेशन, भिवंडी यांचेकडून दिनांक ०२/०४/२०१३ प्राप्त निवेदन.

५) मे. आत्मबंधू इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन यांचे दिनांक १०/०४/२०१३ रोजी प्राप्त लेखी निवेदन.

६) मे. न्यू पटेल ट्रान्सपोर्ट सर्विस तथा टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ चे मालक श्री. जवाहरलाल बी. पटेल यांचे दिनांक १५/०४/२०१३ रोजीचे टपालामार्फत प्राप्त निवेदन.

७) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचा दि.२५/०४/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

८) अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे पत्र क्र. एफटीएल/एफडीओ/३२/१३ अन्वये दक्षता शाखेकडून दिनांक ३०/०४/२०१३ रोजी प्राप्त पृथ:करण अहवाल.

९) या कार्यालयाचे "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१९/२०१३/जा.४०९, दिनांक ०६/०५/२०१३.

१०) मे. आत्मबंधू इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन यांचे दिनांक १३/०५/२०१३ रोजी प्राप्त लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१९/२०१३/जा. ८५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ३१ / ०५/२०१३.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १३/०३/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अंधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. आत्मबंधू इंडस्ट्रीज, गाळा क्रमांक सी-२४/२५, जय माता

दी कंपाऊंड, काल्हेर, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे ची तपासणी घेण्याकरिता सायंकाळी सुमारे ०५:१५ वाजता वरील उक्त गाळयात प्रवेश केला. तेथील कार्यालयात उपस्थित व्यक्तिस अधिकाऱ्यांनी त्यांची ओळख करुन दिली व भेटीचे प्रयोजन सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर इसमास त्याचे नाव गाव व पद विचारले असता, त्याने त्याचे नाव विनोद जैन असून, ते या कंपनीचे मालक दिलीप जैन यांचे भाऊ आहेत असे सांगितले. त्यांचे भाऊ आता घरी गेले आहेत. थोडयावेळासाठी त्यांना येथे थांबवून गेले आहेत. सर्व व्यवसाय त्यांचे भाऊ दिलीप जैन पाहतात. इथल्या व्यवसायाबाबत त्यांना काहीही माहिती नाही असे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्यांना दिलीप जैन यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधून घटनास्थळी बोलावून घेण्यास सांगितले. तेव्हा त्यांनी दिलीप जैन यांचेशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता, दिलीप जैन हे घटनास्थळी पोहचत असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी दोन कामगार काम करीत असल्याचे दिसले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष त्यापैकी एका कामगाराचे नांव विचारले असता, त्यांनी त्याचे नांव मनोज कालूराम विष्णाई असे सांगून सदर ठिकाणी तो २-३ महिन्यापासून कार्यरत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर गाळयामध्ये कोणता व्यवसाय चालतो याविषयी विचारणा केली असता, मनोज कालूराम विष्णाई याने सांगितले की, सदर गाळयामध्ये, विविध प्रकारच्या खाद्यतेलाची टँकरमार्फत आवक करुन गाळयामधील लोखंडी टाक्यांमध्ये साठवणूक केली जाते व त्यानंतर खाद्यतेल विविध प्रकारच्या पॅकिंगमध्ये पॅक करुन डिस्ट्रिब्युटर्समार्फत विक्री केली जाते, असे पंचासमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले. गाळयाच्या प्रवेशद्वारात टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ उभा असून याबाबत सदर टँकरचा चालक नंदलाल रामराज यादव याचेकडे चौकशी केली असता, त्याने सांगितले की, सदर टँकर दिनांक ०९/०३/२०१३ रोजी तिरुपुर येथून भरुन निघाला व आज दिनांक १३/०३/२०१३ रोजी दुपारी ३ ते ३:३० वाजता आत्मबंधू इंडस्ट्रिज येथे आला. सदर टँकरमध्ये खोबरेलतेल आहे. तो टँकर आता आत्मबंधू इंडस्ट्रिजमध्ये अनलोड करावयाचा होता. याबाबत ड्राईव्हर नंदलाल रामराज यादव याचा लेखी जबाब घेतला आहे. टँकरसोबतची इनव्हाईसची पाहणी केली असता, चौकशीअंती सदर टँकर सोबत सन ट्रेडर्स तिरुपूरचे क्रमांक १५, दिनांक ०९/०३/२०१३ रोजी आत्मबंधू इंडस्ट्रिजसाठी कोकोनट ऑईल १५८१० कि.ग्रॅ. व रक्कम रु. १०८२९८५/- असा उल्लेख असलेले इनव्हाईस आढळून आले. दरम्यान घटनास्थळी आत्मबंधू इंडस्ट्रिजचे मालक दिलीप जैन उपस्थित झाले. त्यांच्याकडे अधिकाऱ्यांनी सदर कंपनीत चालणाऱ्या खाद्यतेलाच्या व्यवसायासंबंधीचे परवाना व आवश्यक कागदपत्रे तपासणीकरीता मागितले असता, त्यांनी दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत वैध असलेला घाऊक परवाना क्रमांक ३७/फ/भिवंडी/११/सं.प./८७ (घा) व साठा पुस्तक ज्यावर दिनांक १३/०३/२०१३ पर्यंत नोंदी घेतल्या आहेत. १८३२१ किलो सुरुवातीची शिल्लक दाखविली आहे. हे सादर केले आहे. तथापी, आत्मबंधू

इंडस्ट्रिजचे मालक दिलीप जैन यांनी १) ६ लोखंडी टाक्यांचे कॅलिब्रेशन चार्ट, २) खरेदी बिले, ३) विक्री बिले व ४) दिनांक १३/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेले सनफ्लॉवर ऑईल १० टन चे इनव्हाईस बिल ही कागदपत्रे अधिकाऱ्यांनी मागणी करुनही सादर केली नाहीत.

तद्नंतर अधिकारी व पंच यांनी विनोद जयंतीलाल जैन यांचेसमवेत कंपनीच्या व्यवसायाच्या ठिकाणाची पाहणी केली. सदर ठिकाणी एकूण ६ लोखंडी टँक आढळून आले. सदर टँकमध्ये वेगवेगळया प्रकारचे आवक झालेले खाद्यतेल साठविले जाते. ते खाद्यतेल लोखंडी टाकीतून पाईपद्वारे संबंधित फिलिंग मशीनद्वारे विविध क्षमतेच्या पॅकिंग युनिटमध्ये पॅक केले जाते. साधारणपणे खाद्यतेल १५ लिटर्स, ५ लिटर, १ लिटर, तर खोबरेल तेल ५० मि.लि., १०० मि.लि., २०० मि.लि. व १ लिटर अशा क्षमतेच्या वेगवेगळ्या पत्र्याचे डबे/प्लास्टीकच्या बाटल्या, जार, पाऊचमध्ये पॅकिंग केली जाते. पॅक केलेल्या डबा/बाटली/जार/पाऊचना सदर कंपनीचे वेगवेगळया नावाचे संबंधित ब्रॅन्डची लेबल्स लावली जातात. त्यानंतर स्टॉकिस्ट अथवा डिस्ट्रीब्युटर्स यांना विक्री करण्यासाठी पाठविले जाते. घटनास्थळी आढळून आलेल्या सदर ब्रॅन्डची नांवे पुढीलप्रमाणे, प्युरॉन रिफाईंड ग्राऊंड नट ऑईल, प्रिमियम रिफाईंड ग्राऊंड नट, प्रिंस सरसो का तेल, नवनिधी कोको फ्रेश कोकोनेट ऑईल, प्रिमियम डबल फिल्टर्ड ग्राऊंड नट ऑईल, प्युरॉन तिळ तेल, प्युरॉन ग्रांऊड नट ऑईल, प्रिमियम रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल, प्युरॉन रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल, अनुपम रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल, आयातीत प्रिंस रिफाईंड पामोलिन, इत्यादी.

त्यांच्यांसमक्ष अधिकाऱ्यांनी गाळयामधील टाक्यातील व पॅकींग केलेल्या तेलाची पंचासमक्ष मोजदाद केली. ती खालील तक्ता क्रमांक १ व २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आढळून आली.

तक्ता क्र. १

प्रत्यक्ष तेलाचे मोजमाप

| अ.क्र. | टाकी क्र. | तेलाचा प्रकार | तेल साठा (क्विंटल) | दर (क्विंटल) | बाजारभावाप्रमाणे अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | सनफ्लावर ऑईल | २२.१६ | ७५०० | १,६६,१६९.७२/- |
| २ | २ | सनफ्लावर ऑईल | १४.७७ | ७५०० | १,१०,७७९.८२/- |
| ३ | ३ | सनफ्लावर ऑईल | ५.३६ | ७५०० | ४०,२००.६९/- |
| ४ | ४ | सनफ्लावर ऑईल | ०.०० | ० | ० |
| ५ | ५ | सनफ्लावर ऑईल | ११६.५८ | ७५०० | ८,७४,३६९.२७/- |
| ६ | ६ | खोबरेल तेल | १८.३५ | ६५०० | १,१९,२६६.०६/- |
| एकूण | | | १७७.२२ | | १३,१०,७८५.५५/- |

## तक्ता क्र. २

## खाद्यतेलाचा साठा

| अ. क्र. | तपशिल/ ब्रॅण्ड | तेलाचा प्रकार | डब्याची/ पाऊची क्षमता | एकूण संख्या | एकूण तेल लि. | दर / लि. | बाजारभावा प्रमाणे अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टलाईन | शेंगतेल | १५ | ४३ | ६४५.०० | ८० | ५१,६००/- |
| २ | फ्युरॉन | शेंगतेल | १३.६५० | ३० | ४०९.५० | ८० | ३२,७६०/- |
| ३ | फ्युरॉन रिफाईंड | शेंगतेल | १३.६५० | ३२ | ४३६.८० | ८० | ३४,९४४/- |
| ४ | प्रिमियम फ्युरॉन | शेंगतेल | ४.५५० | ३२ | १४५.६० | ८० | ११,६४८/- |
| ५ | फ्युरॉन | शेंगतेल | ०.४५५ | १२ | ५.४६ | ८० | ४३६.८०/- |
| ६ | फ्युरॉन | शेंगतेल | ०.९१० | ८४ | ७६.४४ | ८० | ६,११५.२०/- |
| ७ | विजय तिळ ऑईल | तिळ | १५.०० | १८ | २७०.०० | १०० | २७,०००/- |
| ८ | नवनिधी कोको फ्रेश | तिळ | ०.०९१ | १४५ | १३.२० | १०० | १,३१९.५०/- |
| ९ | नवनिधी कोको फ्रेश | तिळ | ०.१८२ | ७९२ | १४४.१४ | १०० | १४,४१४.४०/- |
| १० | फ्युरॉन | तिळ | ४.५५० | ११ | ५०.०५ | १०० | ५,००५/- |
| ११ | फ्युरॉन रिफाईंड | तिळ | ०.४५५ | ३१२ | १४१.९६ | १०० | १४,१९६/- |
| १२ | प्रिमियम फ्युरॉन | तिळ | ०.९१० | ४८० | ४३६.८० | १०० | ४३,६८०/- |
| १३ | फ्युरॉन | तिळ | ०.४५० | ४ | १.८० | १०० | १८०/- |
| १४ | फ्युरॉन | सनफ्लॉवर | ४.५५ | २ | ९.१० | ७५ | ६८२.५०/- |
| १५ | फ्युरॉन | सनफ्लॉवर | ०.९१० | २१६ | १९६.५६ | ७५ | १४,७४२/- |
| १६ | फ्युरॉन | सनफ्लॉवर | १३.६५० | २९ | ३९५.८५ | ७५ | २९,६८८.७५/- |
| १७ | फ्युरॉन रिफाईंड | सनफ्लॉवर | १३.६५० | ५८ | ७९१.७० | ७५ | ५९,३७७.५०/- |
| १८ | प्रिमियम फ्युरॉन | सनफ्लॉवर | ०.९१० | ३६० | ३२७.६० | ७५ | २४,५७०/- |
| १९ | फ्युरॉन | सनफ्लॉवर | ०.४५५ | ३६० | १६३.८० | ७५ | १२,२८५/- |
| २० | फ्युरॉन | सनफ्लॉवर | ०.९१० | ४०८ | ३७१.२८ | ७५ | २७,८४६/- |
| २१ | फ्युरॉन | सनफ्लॉवर | १३.६५० | १० | १३६.५० | ७५ | १०,२३७.५०/- |
| २२ | फ्युरॉन | सनफ्लॉवर | ४.५५० | ३६ | १६३.८० | ७५ | १२,२८५/- |
| २३ | फ्युरॉन | सनफ्लॉवर | ०.९१० | ३६० | ३२७.६० | ७५ | २४,५७०/- |
| २४ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.९१० | १०२० | ९२८.२० | ६५ | ६०,३३३/- |
| २५ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.९१० | १६ | १४.५६ | ६५ | ९४६.४०/- |
| २६ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.९१० | १६० | १४५.६० | ६५ | ९,४६४/- |
| २७ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.९१० | ८ | ७.२८ | ६५ | ४७३.२०/- |
| २८ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | १.८२० | १२ | २१.८४ | ६५ | १,४१९.६०/- |
| २९ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.१८२ | ३१०० | ५६४.२० | ६५ | ३६,६७३/- |
| ३० | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.१८२ | ५० | ९.१० | ६५ | ५९१.५०/- |
| ३१ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.०९१ | २००० | १८२.०० | ६५ | ११,८३०/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.०९१ | ७० | ६.३७ | ६५ | ४१४.०५/- |
| ३३ | कोको फ्रेश | खोबरेल | ०.४५५ | २१२० | ९६४.६० | ६५ | ६२,६९९/- |
| ३४ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.४५५ | ८ | ३.६४ | ६५ | २३६.६०/- |
| ३५ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.९१० | ५६० | ५०९.६० | ६५ | ३३,१२४/- |
| ३६ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.०४६ | ४८०० | २२०.८० | ६५ | १४,३५२/- |
| ३७ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.०७४ | ४०० | २९.६० | ६५ | १,९२४/- |
| ३८ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ०.०३६ | ८०० | २८.८० | ६५ | १,८७२/- |
| ३९ | नवनिधी कोको फ्रेश | खोबरेल | ४.५५० | ४ | १८.२० | ६५ | १,१८३/- |
| ४० | टँकरमधील नवनिधी कोको फ्रेश सुटा तेल | खोबरेल | १५८१० कि.ग्रॅ. | | १७३७३.६२ | | १०,८२,९८५/- |
| | एकूण | | | | २६६८८.५५ | | १७,८०,१०३.५०/- |

याशिवाय सदर कंपनीत नवनिधी डेअरी गोल्ड काऊज प्युअर घी असा ब्रॅण्ड असलेले प्रत्येकी १ लिटरच्या प्लास्टीक पाऊचमध्ये पॅक असलेले, एका कार्टूनमध्ये १५ पाऊच असे एकूण १० कार्टून आहेत. असे एकूण १५० लिटर्स घी आहे.

सदर कंपनीचा आणखी एक गाळा समोरच्या बाजूस आहे, त्याचा पत्ता आत्मबंधू इंडस्ट्रिज, गाळा नं. एफ-२ असा आहे. सदर गाळयामध्ये कोणत्या प्रकारच्या खाद्यतेलाची साठवणूक करुन ठेवली आहे, याची पाहणी करण्याकरीता अधिकाऱ्यांनी त्या गाळयाची तपासणी केली. त्यामध्ये विविध क्षमतेच्या प्लास्टीक पाऊच, पत्र्याचे डबे यामध्ये पॅक केलेले विविध ब्रॅण्डचे एकूण १५३९८.५८ लिटर इतके देशी घी आढळून आले. याबाबत मालक दिलीप जैन यांना त्यांचा जबाब देण्यास सांगितले असता, त्यांनी माझी प्रकृती ठिक नाही, मला उच्च रक्तदाबाचा त्रास होत आहे. त्यामुळे लेखी कोणताही जबाब देण्याच्या स्थितीत नाही असे पंचांसमक्ष सांगितले. त्यामुळे त्यांचा जबाब नोंदविता आला नाही. दरम्यान नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी येथे संपर्क साधून घटनेची माहिती कळविली व संबंधित पोलिसांना त्वरीत घटनास्थळी येणेबाबत कळविले.

अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सदर कंपनीत विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा २७०.३६ क्विंटल व टँकरमधील कोकोनट ऑईल १५८.१० क्विंटल असा एकूण ४२८.४६ क्विंटल एवढा साठा घटनास्थळी आढळून आला. परवानाधारकाकडे असलेल्या परवान्यावर नियमानुसार एकूण ३०० क्विंटल पर्यंत साठा करण्याची परवानगी आहे. म्हणजे सदर परवानाधारक दिलीप जैन यांचेकडे परवान्यातील साठा मर्यादेपेक्षा १२८.४६ क्विंटल इतका खाद्यतेल साठा जास्त आढळला. तद्नंतर घटनास्थळी उपस्थित असलेले दिलीप जैन यांचेकडे अधिकाऱ्यांनी सदर खाद्यतेल कोणाकडून खरेदी करता याबाबत विचारणा करुन त्याबाबतची खरेदी बिले मागितली असता, दिलीप जैन यांनी कोणतीही खरेदी बिले अथवा विक्री बिले नाहीत असे सांगितले व त्यांनी ती सादर केली नाहीत. तसेच घटनास्थळी

आवक झालेल्या तसेच विक्री केलेल्या खाद्यतेलाच्या कोणत्याही नोंदवहया, अभिलेख ठेवले नाहीत असे त्यांनी चौकशीत अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. सदर कंपनीत खाद्यतेलाच्या परवानाच्या साठा मर्यादेपेक्षा जास्त खाद्यतेल साठा बाळगला आहे. त्यामुळे सदर तपासणीत जास्त आढळलेला १२८.४६ क्विंटल खाद्यतेल साठा पुढील आदेशापर्यंत जागीच जप्त करावा असे अधिकाऱ्यांचे पंचांसमक्ष मत झाले.

सदर तपासणीमध्ये पुढीलप्रमाणे दोष आढळून आले आहेत. १) सदर परवानाधारक दिलीप जैन यांचेकडे परवान्यातील साठा मर्यादेपेक्षा १२८.४६ क्विंटल इतका खाद्यतेल साठा जास्त आढळला. २) सदर ६ लोखंडी टाक्यांचे कॅलिब्रेशन चार्ट ठेवले नाहीत. ३) खाद्यतेल कोणाकडून खरेदी करतात याची कोणतीही खरेदी बिले तपासणीकरीता सादर केली नाहीत. ४) खाद्यतेल कोणाला विक्री करतात त्याची कोणतीही विक्री बिले तपासणीकरीता सादर केली नाहीत. ५) दिनांक १३/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेले सनफ्लॉवर ऑईल १० टनचे इनव्हाईस बिल केले नाहीत. ६) दिनांक १३/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेले सनफ्लॉवर ऑईल १० टनचे आवक साठा पुस्तकात घेतलेली नाही. ७) परवानाधारकाकडे खाद्यतेल परवाना असताना सदर ठिकाणी १५० लिटर घी अनधिकृतरित्या ठेवले आहे. दरम्यान घटनास्थळी पोलीस शिपाई श्री. योगेश सखाराम महाले, बक्कल क्रमांक ६३५६ व पोलिस शिपाई श्री. अरुण भास्कर सैदणे, बक्कल क्रमांक ७६८, नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी हे हजर झाले. त्यांना घटनेची रितसर माहिती अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष दिली.

उपरोक्त नमूद जप्त तेल साठयातून सदर जास्त आढळलेला १२८.४६ क्विंटल तेल साठा वेगळा काढणे, ठेवणे सद्यस्थितीत शक्य नाही. सदर सुटा व पॅक केलेला खाद्यतेल साठा प्रत्यक्षात हलविणे शक्य नाही. तो ठेवण्यासाठी कंपनीच्या मालकाकडे वेगळे गोदाम उपलब्ध नाही, ही वस्तूस्थिती विचारात घेऊन सदर कंपनीतील लोखंडी टाकी क्रमांक १ ते ५ मधील सनफ्लॉवर ऑईल, टाकी क्रमांक ६ मधील खोबरेल तेल, टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ मधील खोबरेल तेल, पॅकिंगमधील खोबरेल तेल, सनफ्लॉवर तेल, तिळ तेल व शेंगदाणा तेल ज्याचा तपशिल तक्ता क्रमांक १ व २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असा एकूण ४२८.४६ क्विंटल इतका खाद्यतेल साठा आहे त्या स्थितीत जागीच जप्त करुन एकूण रुपये ३०,९०,८८९/- किंमतीचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. सदर कंपनीत लोखंडी टाकी क्रमांक १ ते ३, ५ व ६ मधील खाद्यतेलाचे नमुने प्रत्येक टाकीतील प्रत्येकी १ लिटर क्षमेतेच्या पारदर्शक प्लॅस्टीकच्या स्वच्छ व रिकाम्या पारदर्शक बाटल्यांमध्ये पंचासमक्ष व मालक दिलीप जैन यांचेसमक्ष नियमानुसार रासायनिक पृथ:करणासाठी घेण्यात आले आणि ते पंचांसमक्ष जागीच सिलबंद करण्यात आले.

अशाप्रकारे, मे. आत्मबंधू इंडस्ट्रिजचे मालक दिलीप जैन यानी खाद्यतेलाच्या परवान्यातील साठा मर्यादेपेक्षा जास्त साठा बाळगल्यामुळे, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, त्यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ व त्याआदेशान्वये देण्यात आलेल्या परवान्यातील अटी व शर्तीचा आणि जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० च्या तरतूदीचा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. ा २३/२०१३, दिनांक १४/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याकरिता जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना दिनांक २२/०३/२०१३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०२/०४/२०१३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत. सदर सुनावणीस म्हात्रे अँड असोसिएट्सचे अॅड. श्री. किशोरकुमार जी. म्हात्रे हे मे.आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन यांचेवतीने वकालतनाम्यासह उपस्थित राहिले. तसेच सदर सुनावणीस मे.आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन हे उपस्थित राहिले. सुनावणीस उपस्थितांनी त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १०/०४/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. जे.के. ढमाळ हे उपस्थित राहिले व दिनांक ०२/०४/२०१३ रोजी टपालामार्फत सादर करण्यात आलेले अभिवेदन कायम असल्याचे सांगुन सदर प्रकरणी जप्त नसलेल्या टँकरमध्ये खाद्यतेलाचा साठा असुन सदरचा टँकर पोलिस ठाणे येथे सुरक्षिततेच्या दृष्टिने ठेवणे सोयीस्कर नसल्याने टँकरमधील खाद्यतेलाचा साठा हा नमूद साठा मालकाकडे रिकामा करुन घेण्यास विनंती केली व त्याअनुषंगाने विनंतीपत्र दिल्याचे सांगितले. सदर सुनावणीस मे.आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन हे उपस्थित राहिले व त्यांचे वतीने म्हात्रे अँड असोसिएट्सचे अॅड. श्री. किशोरकुमार जी. म्हात्रे यांनी लेखी निवेदन सादर केले व त्यांना त्यांच्या अशिलाच्या वतीने प्रकरणी प्राप्त साठापुस्तक व इतर दस्ताऐवजचे अवलोकन करुन लेखी म्हणणे सादर करण्यासाठी पुढील सुनावणी ठेवण्याची

विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २३/०४/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २३/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे.आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन हे उपस्थित राहिले. तसेच म्हात्रे अँड असोसिएट्सचे अॅड. श्री. किशोरकुमार जी. म्हात्रे हे मे.आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन यांचेवतीने उपस्थित राहिले. सुनावणीच्यावेळी मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक यांना दिनांक ०१/०३/२०१३ ते १३/०३/२०१३ या कालावधीत आवक झालेल्या सुटा खाद्यतेलाच्या साठ्याचे प्रयोगशाळेकडील पृथःकरण अहवाल सादर करण्यास सुचित केले असता त्यांनी सद्यस्थितीत उपलब्ध नसल्याचे सांगितले असता त्यांना संबंधित प्रयोगशाळेकडून प्राप्त करुन पृथःकरण अहवाल सादर करण्यास सुचित केले असता त्यांनी त्यास होकार दिला तथापी, पृथःकरण अहवाल सादर केला नाही, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचेकडून वाचावे क्र. ८ अन्वये प्राप्त झालेल्या रासायनिक पृथःकरण अहवालामध्ये " and I am of the opinion that above samples No C-11 and C-71 confirm to the standards of Sunflower Oil and C-83, C-94 and C-22 does not confirm to the standards of Sunflower Oil as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011 with respect to above parameters", असे नमूद आहे.

सदर प्रकरणी, जप्त साठ्याच्या नमून्यांचा पृथःकरण अहवाल प्राप्त झाला असून अंतिम निकालपत्र देण्यास विलंब लागणार आहे. प्रस्तुत प्रकरणी, टॅंकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ मधील जप्त करण्यात आलेला खोबरेल तेल या खाद्यतेलाचा साठा हा नाशवंत आहे. तपासी पोलिस अधिकारी यांनी सादर केलेल्या अभिवेदनात सदरचे टॅंकर हे पोलिस स्टेशनच्या समोरील रोडवर उभा असल्याचे नमूद केले आहे. सबब, सदरचा खाद्यतेलचा साठा हा नाशवंत असल्याने सदरचा टॅंकरमधील साठा हा आणखी काही काळ तसाच राहील्यास तो साठा खराब होऊन नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने या कार्यालयाचे वाचावे क्र. ०९ अन्वये अंतरीम आदेश पारीत करण्यात आले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (प्रशा.), नारपोली पोलिस स्टेशन, भिवंडी यांचेकडून दिनांक ०२/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक यांचेकडे सदरचा

व्यवसाय करण्यासाठी फुड्स विभागाचे, सेल्स टॅक्स विभागाचे परवाने व डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज यांचेकडील प्रमाणपत्र, ग्रामपंचायत काल्हेर यांचेकडील ना-हरकत प्रमाणपत्र आहे अशा प्रकारे कागदपत्र असल्याचे सांगुन त्यांनी पुढे सांगितले की, दिनांक १३/०३/२०१३ रोजी रात्रौ ८.३० सुमारास शिधावाटप कार्यालयाचे पथकाने त्यांचे कंपनीमधील खाद्यतेल व खोबरेल तेलाच्या साठ्याची तपासणी केलेली असुन त्यांची तब्येत ठिक नसल्याने सदर तपासणी दरम्यान कंपनीमध्ये हजर नसल्याचे सांगितले. तपासणीच्यावेळी कंपनीमध्ये २७०.३६ क्विंटल इतका खाद्यतेलाचा साठा आढळुन आला. त्यानंतर शिधावाटप अधिकारी यांनी तिरुपुर, तामीळनाडू येथून खोबरेल तेलाने भरलेला टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ हा कंपनीच्या परिसराच्या बाहेर उभा असल्याने तो मालासह जप्त केला आहे. त्यांनी शिधावाटप अधिकारी यांना निदर्शनास आणुन दिले की, खोबरल तेलाचा पुरवठा करणाऱ्या इसमाबरोबर ७ दिवस अगोदर खोबरेल तेलांचे दराबाबत बोलणी केलेली होती. परंतु त्याच्याकडे खोबरेल तेलाचा पुरेसा साठा असल्याने त्याने खोबरेल तेलाचा पुरवठा करणाऱ्या इसमाकडून खोबरेल तेलाची मागणी केलेली नव्हती व त्याच्या कंपनीला खोबरेल तेलाची आवश्यकता नसताना त्याने खोबरेल तेलाने भरलेला टँकर पाठविला आहे. सदरचा माल कंपनीच्या गोडावुनमध्ये खाली केलेला नसताना, मालाचे वजन केले नसताना, तसेच टँकरमधील मालाचे सॅम्पलचे गुणवत्ता परिक्षण झालेला नसतानासुद्धा शिधावाटप अधिकारी यांनी टँकरमधील माल जप्त केलेला आहे. सदरचा माल त्यांचे मालकीचा नाही असे सांगुन शिधावाटप अधिकारी यांनी त्यांचेवर नाहक खोटी केस केली आहे. तथापी, एकंदरीत सदर गुन्ह्याचे आजपावेतो करण्यात आलेल्या तपासात मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज यांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये ३०० क्विंटल खाद्यतेलाचा साठा करता येतो हे माहित असतानासुद्धा त्यांनी सदर खाद्यतेलाच्या परवान्यातील अटी व शर्तींचा भंग करुन साठा मर्यादेपेक्षा १२८.४६ क्विंटल खाद्यतेलाचा जास्त साठा बाळगुन अनुज्ञप्ती आदेश तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केलेला आहे, असे नमूद आहे.

मे. आत्मबंधू इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन यांचे दिनांक १०/०४/२०१३ रोजी प्राप्त लेखी निवेदनात, कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद मुद्यांच्या अनुषंगाने लावण्यात आलेले आरोपांबाबत ते मान्य नसल्याने मा. प्राधिकरणाकडे नकार दर्शवित आहेत. सदरचे प्रतिज्ञापत्र हे सिमित मुद्यांवर आधारीत असुन मा. प्राधिकरणाकडे जप्त साठा हा नाशवंत असल्याने ते परत करण्याची मागणी करीत आहेत. जप्त साठ्याचे मालक हे बी.कॉम असुन ते शुद्ध घी आणि खाद्यतेलाच्या पॅकींग, ब्रॅण्डींग आणि विक्रीचा सन २००१ पासुन व्यवसाय करीत आहेत. सदरचा व्यवसाय हा त्यांचा वडीलोपार्जित व्यवसाय आहे. सन २००१ साली त्यांच्या अशिलाने आत्मबंधु इंडस्ट्रीज या नावाने व्यवसाय सुरु केला असुन सद्यस्थितीत ते विविध प्रकारचे वैध परवाने धारण करीत आहेत. उदा.

D OFFICE UMBA

अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, विक्रीकर विभागाकडील व्हॅट आणि सिएसटी नोंदणी प्रमाणपत्र, वैधमापनशास्त्र विभागाकडून पॅकींगचा परवाना, उद्योग संचालक, महाराष्ट्र राज्य कडील नोंदणी प्रमाणपत्र, ग्रामपंचायत काल्हेर यांचेकडील परमीट. सन २००९ पुर्वी ते राई, सोयाबीन, पामोलीन, सनफ्लॉवर, फिल्टर्ड शेंगदाणा तेल, रिफाईंड शेंगदाणा तेल, तीळ आणि खोबरेल ते अशा आठ प्रकारच्या तेलाचे व्यवसाय करीत होते. तद्नंतर केंद्र/राज्य सरकार यांनी निर्देशित केल्यानुसार डीलर/घाऊक व्यापारी/स्टॉकीस्ट/उत्पादक यांनी साठवणूकीच्या क्षमतेचे पालन करणे बंधनकारक ठरविल्याने सदर बाबत पुर्तता करण्यासाठी त्यांनी तात्काळ तीन प्रकारच्या खाद्यतेलाचे व्यवसाय सिमित केले. सदर व्यवसायाची प्रक्रिया पुढील प्रमाणे आहे- खाद्यतेलाच्या दराबाबत दलालांकडून चौकशी करण्यात येते. तद्नंतर सुटा साठ्याचे दर ठरल्यानंतर पुरवठादारास ठरीव दरानुसार चांगल्या प्रतीचे तेल प्राप्त करण्यासाठी मागणी करण्यात येते. त्यानुसार एका टँकरचे ऑर्डर दिल्यानंतर पुरवठादार वितरणाबाबत तारीख ठरवुन प्राप्त करुन घेण्यात येते. सदरचा टँकर त्यांच्या गोडावुन मध्ये आल्यानंतर त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचारी हे साठ्याचा वास व चव घेवुन चाचणी करतात. तद्नंतर छोट्या बाटलीमध्ये २ नमूने घेण्यात येवुन त्यापैकी एक नमूना बॉम्बे लॅबोरेटरी, मस्जिद बंदर, मुंबई येथे पृथःकरणासाठी पाठविण्यात येतो व दुसरा नमूना जीएलसी ॲनालायसिस करीता ॲटलास लॅबोरेटरी, मस्जिद बंदर, मुंबई येथे पाठविण्यात येतो. तद्नंतर संबंधित प्रयोगशाळेतुन दुरध्वनीवरुन अहवाल प्राप्त करुन ते नमूद टँकर वे ब्रिजवर पाठविण्यात येते व इलेक्ट्रीक मोटार पंपच्या सहाय्याने टँकरमधील साठा हा गोदामातील टाक्यांमध्ये उतरविण्यात येतो. तद्नंतर प्राप्त झालेला सुटा साठा हा ५० मि.लि. ते १५ लिटरच्या प्लास्टिक पाऊच, कॅन व बाटल्यांमध्ये पॅकींग केला जातो. सदरचा पॅकींग केलेला साठा हा विविध विभागातील स्टॉकीस्टला त्यांच्या मागणीनुसार पुरवठा केला जातो. दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता जप्त साठ्याचे मालक दिलीप जैन यांना त्यांचे बंधु विनोद जैन यांनी गोदामात पोचल्यानंतर अवगत केले की, टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ मध्ये खोबरेल तेलाचा साठा हा तिरुपुर, तामिळनाडू येथुन आगमन झाले आहे. सदर दिवशी गोडावुन क्रमांक सी-२४/२५ या गोदामात जागेची कमतरता असल्याने ते गोदाम कुलूपबंद करुन त्यांचा कर्मचारी वर्ग शुद्ध घी च्या पॅकींग युनिटमध्ये पॅकींग करीत होते. त्याच दिवशी रात्रौ ०८.१५ वाजता विनोद जैन यांनी टेम्पोमध्ये तेलाचा साठा भरण्यासाठी गोदाम उघडले असता, काही वेळाने श्री. गायकवाड व श्री. सावंतभोसले हे त्यांच्या सोबत असलेल्या २० कर्मचाऱ्यांसोबत गोदामात दाखल झाले. सदर अधिकाऱ्यांनी विनोद जैन यांचेकडे तात्काळ चौकशी सुरु करुन साठापुस्तकची मागणी केली, तर काहीनीं साठा मोजण्याबाबत सहकार्य करण्यास विनंती केली, तर काहींनी त्यांची विचारपुस सुरु केली. विनोद जैन यांनी सन्मानपुर्वक सर्व प्रश्नांची उत्तरे देवुन तपासणी पथकास सहकार्य केले. साठामालक यांची तब्येत बरी

नसतानाही ते अधिकाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार रात्रौ १०.१५ वाजता गोदामात उपस्थित झाले. तद्नंतर साठा मालकास कळले की, अधिकाऱ्यांनी टँकरमधील ईनव्हाईस व इतर कागदपत्रे टँकर चालकाकडून प्राप्त करुन घेतले आहेत. यावरुन टँकरमधील साठा हा साठा मालकास वितरीत झाला नसल्याचे सिद्ध होत आहे. टँकरचे ईनव्हाईस व डिलीव्हरी नोट, वजन काट्याची चिठ्ठी आणि पावती ही सर्व कागदपत्रे साठा मालकाकडे अथवा त्यांच्या कर्मचाऱ्यांकडे नसल्याचे दिसुन येते. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सनफ्लॉवर ऑईलच्या अतिरिक्त साठ्याबाबत विचारणा करुन सदर साठ्याची खरेदी बिलांची मागणी केली असता, सदरचा साठा हा त्याच दिवशी आवक झाला असल्याने त्याबाबतची बिले तपासणीचे वेळी साठा मालकाकडे उपलब्ध नव्हती. तद्नंतर रात्रौ ११.३० च्या सुमारास साठा मालकास टँकरमधील साठा उतरवुन घेण्यास सुचित केले. परंतु सदरचा साठा हा साठा मालक अथवा त्याचे अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांच्या ताब्यात नव्हता. तपासणीच्यावेळी गोदाम मधील साठवणूक केलेला साठा हा विहीत मर्यादेत आहे. टँकरमधील साठा हा साठा मालकाकडे आवक झालेला नाही. खोबरेल तेलाची साठवणूकीच्या टाकीमध्ये खोबरेल तेलाचा साठा उपलब्ध होता. जप्त साठ्याचा पृथ:करण अहवाल प्रयोगशाळेकडून उपलब्ध झालेला नाही. तसेच टँकर रिकामा करण्यासाठी ४ ते ५ कर्मचाऱ्यांची गरज असल्याने व तपासणीच्यावेळी एकच कर्मचारी हजर असल्याने टँकरमधील साठा उतरविणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांनी गोदामात टँकरमधील साठा उतरवुन घेण्यात असहमती दर्शविली. तपासणीच्यावेळी साठा मालकाची तब्येत ठिक नसल्याने त्यांस जबाब देणे शक्य झाले नाही. दिनांक १४ मार्च, २०१३ रोजी अधिकाऱ्यांनी सांगितल्या ठिकाणी व वेळी पाचारण केल्यास ते जबाब देण्यास तयार होते. दिनांक १४/०३/२०१३ रोजी सकाळी ०६.१५ वाजता तपासणीची कार्यवाही अधिकाऱ्यांनी पुर्ण केली व गोदामाची चावी पोलीस कॉन्स्टेबलच्या ताब्यात देण्यात आली. साठा मालक हे सर्व कायदे, नियम, अधिसुचना व वैधानिक सुचनांचे पालन करुन व्यवसाय करीत आहेत. तसेच सदर व्यवसायाकरीता आवश्यक असणारे वैध परमिट, परवाने आणि प्रमाणपत्र त्यांच्याकडे असल्याने दिनांक २२/०३/२०१३ रोजी निर्गमित करण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात यावी. दिनांक १३/०३/२०१३ या तपासणीच्या दिवशी साठा मालकाकडील साठा हा विहीत मर्यादेच्या आत होता. सदर दिवशी खाद्यतेलाची प्रारंभिक शिल्लक १८,३२१ किलो आवक १०,८०० किलो, वितरण ५९६ किलो आणि अखेरची शिल्लक २८,५२५ किलो होती. सदर साठा हा विहीत मर्यादेत असल्याने जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीच्या कार्यवाहीसाठी कारणे दाखवा नोटीस बजावणे योग्य नाही. तपासणीच्यावेळी गोडावुनच्या गेटवर उभा असलेला टँकरमधील साठ्याचे पृथ:करण अहवाल प्राप्त झाला नसल्याने सदर साठ्याची आवक साठा मालकाने घेतली नाही. त्यामुळे तपासणी पथकाने दर्शविलेला साठा चुकीचा आहे. सदर प्रकरणी साठा मालक आदरपुर्वक नमूद करु इच्छितो की, टँकर ड्रायवरने टँकरमधील साठ्याचे

0012

नमूने स्वेच्छेने साठा मालकाच्या हवाली केले. परंतु सदरचे नमूने पृथ:करणासाठी पाठविण्यात आले नाहीत अथवा टँकरमधील साठा उतरवुन घेण्यासाठी साठा मालकाकडून कोणतेही पावले उचलले गेले नसल्याने तपासणी पथकास टँकरमधील साठा मोजदाद करण्याची गरज नव्हती. तसेच साठा मालका विरुद्ध स्थानिक पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. साठा मालकाने मा. सत्र न्यायालय येथे अटकपुर्व जामिन मिळण्याकरीता अर्ज क्रमांक ४९०/२०१३ दाखल केले असुन याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे अपिल, रिव्हीजन, पिटीशन इ. दाखल केले नाहीत. मा. न्यायालयाने साठा मालकास प्रत्येक शनिवारी व सोमवारी नारपोली पोलीस ठाणे येथे हजर राहण्याच्या अटीस अधिन राहुन अटकपुर्व जामिन मंजूर केले आहे. त्यामुळे साठा मालकाची नम्रपुर्वक विनंती की, दिनांक २२/०३/२०१३ रोजी बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस परत घेवुन जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्यापैकी साठा मालकाशी संबंधित असलेला तसेच टँकरमधील साठा वगळुन २७०.३६ क्विंटल साठा योग्य अटी व शर्तीनुसार मुक्त करण्याची विनंती केली, असे नमूद आहे.

मे. न्यू पटेल ट्रान्सपोर्ट सर्विस तथा टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ चे मालक श्री. जवाहरलाल बी. पटेल यांचे दिनांक १५/०४/२०१३ रोजीचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक ०९/०३/२०१३ रोजी माझा टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ या टँकरमधुन कांग्यम (तामीळनाडू) येथून तेल भरुन भिवंडीला आत्मबंधु इंडस्ट्रीजमध्ये दिनांक १३/०३/२०१३ रोजी सकाळी १०.३० वाजता पोहचला. त्यांच्या माणसाने तेलाचे सॅम्पल टँकरमधुन चेकींगसाठी घेतले व दुसरे दिवशी टँकर खाली होईल असे सांगितले. त्याचदिवशी आपल्या लोकांनी आत्मबंधु इंडस्ट्रीजमध्ये धाड टाकली व आपल्या लोकांनी कंपनी सिल करुन टाकली व टँकरमध्ये असलेला माल देखिल सिल करुन टाकला आणि नारपोली पोलिस स्टेशनमध्ये टँकर जमा करुन टाकला. तरी माझा टँकर हा कर्ज काढुन घेतला आहे व त्या कर्जाचा हफ्ता देखिल द्यावा लागतो तसेच टँकरच्या ड्रायव्हरचा भत्ता रोज द्यावा लागतो. तरी आपणांस नम्रतेची विनंती करतो की, माझा टँकर लवकरात लवकर सोडण्याची कृपा करावी ही विनंती, असे नमूद आहे.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांच्या दिनांक २५/०४/२०१३ रोजी प्राप्त झालेल्या अहवालात, मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज यांचे नावे सी-२४/२५, जय मातादी कंपाऊंड, काल्हेर, ता. भिवंडी या पत्त्यावर खाद्यतेलासाठी दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत विधिग्राह्य असेलला परवाना क्रमांक ३७/फ/भिवंडी/सं.प.८७(घा) आहे. सदर परवाना दिलीपकुमार जैन यांचे नावे दिनांक २८/०३/२०११ रोजी वितरीत केलेला असुन परवान्यावर वेगळ्या गोदामाची नोंद नाही. दिनांक १३/०३/२०१३ रोजी परवानाधारकाच्या व्यवसायाच्या ठिकाणी केलेल्या तपासणीत सदर परवानाधारकाकडे साठा मर्यादेपेक्षा १२८.४६ क्विंटल इतका खाद्यतेलाचा साठा जास्त

आढळला असल्याने परवानाधारकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असुन त्याबाबत सुनावणी घेण्यात येणार आहे, असे नमूद आहे.

मे. आत्मबंधू इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन यांचे दिनांक १३/०५/२०१३ रोजी प्राप्त लेखी निवेदनात, दिनांक ०६/०५/२०१३ रोजी पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश त्यांना नारपोली पोलीस स्टेशन मार्फत दिनांक ०८/०५/२०१३ रोजी प्राप्त झाले आहेत. दिनांक २२/०३/२०१३ रोजीच्या नोटीसच्या अनुषंगाने त्यांनी परिपुर्ण निवेदन सादर केले आहे. ते पुन्हा नमूद करु इच्छितात की, अंतरिम आदेशातील मुद्दे त्यांना मान्य नाहीत. त्यामुळे साठा मालक हे अर्जदार म्हणुन अंतरिम आदेशाचे पालन करुन टँकरमधील साठा हा त्यांच्या गोदामात उतरवुन घेवुन मा. प्राधिकरणाने अंतिम आदेश पारित केल्यानंतर योग्य न्यायालयात दाद मागण्यासाठी त्यांना पुर्ण स्वातंत्र्य आहे. दिनांक ०६/०५/२०१३ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने नमूद करु इच्छितात की, दिनांक १३/०३/२०१३ ते २०/०३/२०१३ या कालावधीत गोदाम कुलूपबंद असल्याने व त्याच्या चाव्या नारपोली पोलीस ठाणे येथे असल्याने त्यांना व्यवसाय करणे शक्य झाले नाही. तद्नंतर मा. प्राधिकरणाने पोलीसांना दिलेल्या मौखिक सुचनेनुसार गोदामाची चावी त्यांना परत मिळाली. तपासणीच्यावेळी गोदामातील साठा तसेच टँकरमधील साठा हा जप्त केला आहे. संबंधित पोलीस ठाण्याकडे काही कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रती व अहवालाची मागणी केली असता त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली नाही. सदर व्यवसायासाठी त्यांनी बँकेकडून कर्ज घेतले असल्याने त्यांना त्यांचा व्यवसाय बंद असल्याने त्याची परतफेड करणे शक्य होत नाही. साठा मालक हे दिनांक ०६/०५/२०१३ रोजीच्या अंतरिम आदेशाचे पालन करीत आहेत, असे नमूद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १३/०३/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह मे. आत्मबंधू इंडस्ट्रीज, गाळा क्रमांक सी-२४/२५, जय माता दी कंपाऊंड, काल्हेर, ता. भिवंडी, जिल्हा ठाणेची तपासणी घेतली असता, उक्त तपासणीमध्ये मे. आत्मबंधू इंडस्ट्रिजचे मालक दिलीप जैन यानी खाद्यतेलाच्या परवान्यातील साठा मर्यादेपेक्षा जास्त साठा बाळगल्यामुळे, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, त्यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ व त्याआदेशान्वये देण्यात आलेल्या परवान्यातील अटी व शर्तीचा आणि

जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० च्या तरतूदीचा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. II २३/२०१३, दिनांक १४/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन गोदामातील तसेच टँकरमधील खाद्यतेलाचा व इतर मुद्देमाल असा एकूण रुपये १७,८०,१०३.५०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अनुज्ञप्ती प्राधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्याकडून प्राप्त अहवालात, मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज यांचे नावे सी-२४/२५, जय मातादी कंपाऊंड, काल्हेर, ता. भिवंडी या पत्त्यावर खाद्यतेलासाठी दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत विधिग्राह्य असेलला घाऊक परवाना क्रमांक ३७/फ/भिवंडी/ सं.प.८७(घा) आहे. सदर परवाना दिलीपकुमार जैन यांचे नावे दिनांक २८/०३/२०११ रोजी वितरीत केलेला असुन परवान्यावर वेगळ्या गोदामाची नोंद नाही. दिनांक १३/०३/२०१३ रोजी परवानाधारकाच्या व्यवसायाच्या ठिकाणी केलेल्या तपासणीत सदर परवानाधारकाकडे साठा मर्यादेपेक्षा १२८.४६ क्विंटल इतका खाद्यतेलाचा साठा जास्त आढळला असल्याने परवानाधारकाविरुध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असल्याचे नमूद आहे.

तसेच तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस स्टेशन, भिवंडी यांचे अभिवेदनात, एकंदरीत सदर गुन्ह्याचे आजपावेतो करण्यात आलेल्या तपासात मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक यांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये ३०० क्विंटल खाद्यतेलाचा साठा करता येतो हे माहित असतांनासुद्धा त्यांनी सदर खाद्यतेलाच्या परवान्यातील अटी व शर्तीचा भंग करुन साठा मर्यादेपेक्षा १२८.४६ क्विंटल खाद्यतेलाचा जास्त साठा बाळगुन अनुज्ञप्ती आदेश तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केलेला आहे, असे नमूद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ११(१) अन्वये " No licensee or his agent or servant or any other person acting on his behalf shall contravene any of the terms and conditions of the license " असे नमूद आहे.

कलम ११(२) अन्वये " If the Licensing authority is satisfied that any such licensee or his agent or servant or any other person acting on his behalf contravene any of the said terms or conditions, it may, without prejudice to any other action that may be taken against him, by order in writing cancel or suspend his licence either in respect of all scheduled commodities covered by it or in respect of such of close commodities as it may think fit " असे नमूद आहे.

कलम १३ अन्वये " Maintenance of registers of transactions- Every licensee shall maintain a register of transactions as laid down in the terms and conditions of his licence and shown there in the names, addresses and such other particulars of transactions as the licensing authority may specify " असे नमूद आहे.

कलम १५(c)(i) अन्वये Seize " Any stock of scheduled commodities in respect of which he has reasons to believe that a contravention of any provisions of this order has been, is being, or is about to be commited " असे नमूद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ४(२) अन्वये देण्यात आलेल्या घाऊक परवानामधील अट क्र. ३(i) नुसार " The licensee shall, except when specifically exempted by the Government or by the licensing authority in this behalf maintain a register of daily accounts for each of the commodities mentioned in paragraph (i) showing correctly –

(i) the opening stock of each day.

(j) the quantities received on each day showing the place from where and the source from which received.

(k) the quantities, delivered or otherwise removed on each day, showing the places of destination; and

(l) the closing stock on each day.

अट क्र. ६ अन्वये " The licensee shall not-

(a)(i) enter into any transaction involving purchased, sale or storage for sales of commodities in a speculative manner prejudicial to the maintenance and easy availability of supplies of the commodities in the local market " असे नमूद आहे.

अट क्र. ७ अन्वये " The licensee shall exhibit at the business premises, the price list of the commodities held by him for sale. Such price list shall be legibly written in marathi or in the principal language of the locality concerned. It shall indicate separately the selling prices of different varieties of the commodities " असे नमूद आहे.

अट क्र. ८ अन्वये " The licensee shall, except when specifically exempted by the Government or by the licensing authority in this behalf, issue to every customer, a correct receipt or invoice or cash memo, as the case may be, for any sale exceeding Rs. 100 giving his own name, address, licence number, date of transaction, the quantity sold the price per

kg/liter/package/tin and total amount charged and keep duplicate of the same to be made available for inspection on demand by the licensing authority of any other officer duly authorized in this behalf " असे नमूद आहे.

अट क्र. १० अन्वये " The licensee shall comply with any directions that may be given to him by the Government or by the licensing authority in regard to purchase, sale and storage for sale of the commodities and in regard to the language in which this register, returns, receipts or invoice mentioned paragraphs (3), (4), (7) and (8) shall be written and the authentication of maintenance of the same " असे नमूद आहे.

अट क्र. १३ अन्वये " The licensee shall by liable for departmental action, prosecution or both as the case may be for the breach of any condition of this licence or any directions or orders issued by the Government or licensing authority from time to time. " असे नमूद आहे.

मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज या व्यवसायिक नावे सी-२४/२५, जय मातादी कंपाऊंड, काल्हेर, ता. भिवंडी या नमूद पत्त्यावर महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर, १९९८ अन्वये खाद्यतेल या अनुसुचित वस्तूच्या घाऊक व्यापारासाठी परवाना प्राप्त करुन घेतल्याचे दिसून येते. सदर कंपनीने घटनास्थळी असलेल्या गोदामात विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा २७०.३६ क्विंटल व गोदामासमोर उभा असलेल्या टँकरमधील खोबरेल तेलाचा १५८.१० क्विंटल असा एकूण ४२८.४६ क्विंटल एवढा खाद्यतेलाचा साठा साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. तपासणीच्यावेळी घटनास्थळी उपस्थित असलेले साठा मालक दिलीप जैन यांचेकडे अधिकाऱ्यांनी सदर खाद्यतेल कोणाकडून खरेदी केला याबाबत विचारणा करुन त्याबाबतची खरेदी बिलांची मागणी केली असता; दिलीप जैन यांनी कोणतीही खरेदी बिले अथवा विक्री बिले नाहीत असे सांगितले व त्यांनी ती सादर केली नाहीत. तसेच घटनास्थळी आवक झालेल्या तसेच विक्री केलेल्या खाद्यतेलाच्या कोणत्याही नोंदवहया, अभिलेख ठेवले नाहीत असे त्यांनी चौकशीत अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले ही अत्यंत गंभीर बाब आहे. सदर तपासणीमध्ये परवानाधारक दिलीप जैन यांनी तपासणीच्या दिवशी दिनांक १३/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेले सनफ्लॉवर ऑईल १० टनचे इनव्हाईस बिल तसेच प्राप्त झालेले सनफ्लॉवर ऑईल १० टनचे आवक साठा पुस्तकात नोंदही न घेतल्याचे आढळुन आले. यावरुन परवानाधारक यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ या आदेशाचे तसेच त्याअन्वये देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचे भंग केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ या आदेशामधील तसेच त्याअन्वये त्यांना देण्यात आलेल्या घाऊक परवानाच्या तरतुदींनुसार परवानाधारक म्हणुन त्यांनी खरेदी बिले, विक्री पुस्तक इ. दस्ताऐवज अद्यावत ठेवणे गरजेचे असुन सदरचा संपुर्ण अभिलेख तपासणी पथकास उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तथापी; प्रत्यक्षात तपासणीचे वेळी घटनास्थळी सदरचा महत्वपूर्ण संपूर्ण अभिलेख साठा मालक यांनी सादर केला नाही. मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज या नांवे खाद्यतेलाचा घाऊक व्यवसाय करीत असताना साठा मालक म्हणुन ते करीत असलेल्या व्यवसायात व त्या अनुषंगाने आवश्यक अभिलेखात पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. परंतु तपासणीचे वेळी पथकास या महत्वपूर्ण बाबींचा अभाव असल्याचे सिध्द झाले आहे. प्रचलित नियमानुसार व्यवसाय करीत असतांना परवानाधारकास साठा खरेदी करतांना पुरवठादाराकडून खरेदी बिले प्राप्त करणे त्या अनुषंगाने साठा पुस्तकात नोंदी घेणे तसेच ते पॅकिंग करीत असलेल्या विविध प्रकारच्या खाद्यतेलाची प्रत्यक्षात उपभोक्त्यास विक्री करीत असतांना त्यांनी केलेल्या प्रत्येक विक्री व्यवहाराची बिले तयार करुन त्याचवेळेस उपभोक्त्यास देणे बंधनकारक आहे. सबब, साठा मालक यांनी घटनास्थळी विक्री पुस्तक अथवा विक्री बिलांचा कोणताही तपशिल/अभिलेख सादर केला नसल्याने ते विना विक्री बिलांची अवैध विक्री करीत असल्याने त्यांचा संपूर्णतः अवैध व्यवसाय असल्याचे निष्पन्न होत आहे.

मे. आत्मबंधू इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद मुद्यांच्या अनुषंगाने लावण्यात आलेले आरोप त्यांना मान्य नसल्याचे सांगून जप्त साठा हा नाशवंत असल्याने ते परत करण्याची मागणी केली. तपासणीच्या वेळी गोदामा समोर उभा असलेल्या टँकरबाबत त्यांनी टँकरचे ऑर्डर दिल्यानंतर पुरवठादार वितरणाबाबत तारीख ठरवुन प्राप्त करुन घेण्यात येत असल्याचे सांगून सदरचा टँकर त्यांच्या गोडावुनमध्ये आल्यानंतर त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचारी हे साठ्याचा वास व चव घेवुन चाचणी करतात. तद्नंतर छोट्या बाटलीमध्ये २ नमूने घेण्यात येवुन त्यापैकी एक नमूना बॉम्बे लॅबोरेटरी, मस्जिद बंदर, मुंबई येथे पृथ:करणासाठी पाठविण्यात येतो व दुसरा नमूना जीएलसी ॲनालायसिस करीता ॲटलास लॅबोरेटरी, मस्जिद बंदर, मुंबई येथे पाठविण्यात येतो. तद्नंतर संबंधित प्रयोगशाळेतुन दुरध्वनीवरुन अहवाल प्राप्त करुन ते नमूद टँकरचे वजन करण्यासाठी वे ब्रिजवर पाठविण्यात येतो व इलेक्ट्रीक मोटार पंपाच्या सहाय्याने टँकरमधील साठा हा गोदामातील टाक्यांमध्ये उतरविण्यात येत असल्याचे सांगितले. दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता जप्त साठ्याचे मालक दिलीप जैन यांना त्यांचे बंधु विनोद जैन यांनी गोदामात पोचल्यानंतर त्यांना अवगत केले की, टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ मध्ये खोबरेल तेलाचा साठा हा

तिरुपुर, तामिळनाडू येथुन आगमन झाले आहे. परंतू सदर दिवशी गोडावुन क्रमांक सी-२४/२५ या गोदामात जागेची कमतरता असल्याने ते गोदाम कुलूपबंद करुन त्यांचा कर्मचारी वर्ग शुद्ध घी च्या पॅकींग युनिटमध्ये पॅकींग करीत होते. तद्नंतर अधिकाऱ्यांनी टॅंकरमधील ईनव्हाईस व इतर कागदपत्रे टॅंकर चालकाकडून प्राप्त करुन घेतले असल्याने टॅंकरमधील साठा हा साठा मालकास वितरीत झाला नसल्याचे सिद्ध होत आहे. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सनफ्लॉवर ऑईलच्या अतिरिक्त साठ्याबाबत विचारणा करुन सदर साठ्याची खरेदी बिलांची मागणी केली असता, सदरचा साठा हा त्याच दिवशी आवक झाला असल्याने त्याबाबतची बिले तपासणीचे वेळी साठा मालकाकडे उपलब्ध नव्हती. तद्नंतर रात्रौ ११.३० च्या सुमारास साठा मालकास टॅंकरमधील साठा उतरवुन घेण्यास सुचित केले. परंतु सदरचा साठा हा साठा मालक अथवा त्याचे अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांच्या ताब्यात नव्हता. तपासणीच्यावेळी गोदाम मधील साठवणूक केलेला साठा हा विहीत मर्यादेत आहे. टॅंकरमधील साठा हा साठा मालकाकडे आवक झालेला नाही. जप्त साठ्याचा पृथःकरण अहवाल प्रयोगशाळेकडून उपलब्ध झालेला नाही. तसेच टॅंकर रिकामा करण्यासाठी ४ ते ५ कर्मचाऱ्यांची गरज असल्याने व तपासणीच्यावेळी एकच कर्मचारी हजर असल्याने टॅंकरमधील साठा उतरविणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांनी गोदामात टॅंकरमधील साठा उतरवुन घेण्यास असहमती दर्शविली. दिनांक १३/०३/२०१३ या तपासणीच्या दिवशी साठा मालकाकडील साठा हा विहीत मर्यादेच्या आत होता. त्यामुळे तपासणी पथकाने दर्शविलेला साठा चुकीचा आहे. जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्यापैकी टॅंकरमधील साठा वगळुन उर्वरीत गोदामातील २७०.३६ क्विंटल साठा योग्य अटी व शर्तीनुसार मुक्त करण्यांची विनंती केली आहे.

६ उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता मे. आत्मबंधू इंडस्ट्रीजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन यांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभुल करणारे आहे. सदर प्रकरणी, घटनास्थळी एकूण ४२८.४६ क्विंटल विविध खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये टॅंकर क्र. एमएच-०४-ईबी-३१७ मधील १५८.१० क्विंटल समाविष्ठ आहे. मे. आत्मबंधू इंडस्ट्रीजचे मालक यांनी तपासणीच्या दिवशी पथकास आवश्यक सहकार्य न करता केवळ टाळाटाळ करुन पथकाच्या बहुमुल्य वेळेचा अपव्यय केल्याचे दिसुन येते. तसेच सुनावणीच्या वेळी त्यांनी टॅंकर क्र. एमएच-०४-ईबी-३१७ मधील खोबरेल तेलाचा साठा हा केवळ साठा पुस्तकात आवक झाल्याची नोंद न घेतल्याच्या सबबीवरुन त्यांनी टॅंकरमधील साठ्याच्या मालकीचा दावा करण्यास नकार दिल्याचे दिसून येते. सदर साठ्याच्या

पृष्ठार्थ त्यांनी घटनास्थळी अथवा सुनावणीच्या वेळी कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

मे. न्यू पटेल ट्रान्सपोर्ट सर्विस तथा टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ चे मालक श्री. जवाहरलाल बी. पटेल यांचे निवेदनात, दिनांक ०९/०३/२०१३ रोजी त्यांचा टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-३१७ या टँकरमधुन कांग्यम (तामीळनाडू) येथून तेल भरुन भिवंडीला आत्मबंधु इंडस्ट्रीजमध्ये दिनांक १३/०३/२०१३ रोजी सकाळी १०.३० वाजता पोहचला. त्यांच्या माणसाने तेलाचे सॅम्पल टँकरमधुन चेकींगसाठी घेतले व दुसरे दिवशी टँकर खाली होईल असे सांगितले. सदर निवेदना सोबत टँकर मालकाने सादर केलेल्या साठ्यासंबंधीचे कागदपत्रांचे अवलोकन करता, दिनांक ०९/०३/२०१३ रोजी मे. सन ट्रेडर्स, तिरुपूर, तामीळनाडू या आस्थापनेने मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज यांच्या नावे कन्झाईनर कॉपी क्र. ३४ तसेच बिल क्र. १५ अन्वये १५८.१० क्विंटल खोबरेल तेलाचा साठा नमूद टँकरमधून पाठविण्यात आल्याचे दिसून येते.

वास्तवीक पाहता मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक यांनी सदर टँकरमधील खाद्यतेलाचा साठा हा मे. सन ट्रेडर्स यांच्याकडून खरेदी करुन तो नमूद टँकरमार्फत सुमारे १२०० ते १५०० किलोमीटर अंतरावरुन मागविण्यात आला. तथापी, त्यांच्या गोदामात जागा नसल्याने त्यांनी टँकरमधील साठा उतरवून घेतला नसल्याचे कबूल केले आहे. तसेच टँकर मालकानेही टँकरमधील साठा हा साठा मालक दुसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक १४/०३/२०१३ रोजी गोदामात उतरवून घेणार असल्याचे सांगितले आहे. यावरुन मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक यांनी केवळ गोदामात जागा नसल्याच्या सबबीवरुन नमूद टँकर हा गोदामासमोर उभा करुन ठेवला असताना पथकाने धाड टाकून साठा जप्त केल्यानंतर त्यांनी टँकरमधील साठा हा साठापुस्तकात नोंद न घेतल्याची सबब सांगून संदरचा साठा त्यांच्या मालकीचा नसल्याचे सांगितले ही अत्यंत गंभीर बाब आहे.

महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१० अन्वये महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर ठिकाणी खाद्यतेलाच्या साठवणूकीकरीता घाऊक परवानाधारकास विहीत कमाल मर्यादा ३०० क्विंटल असुन तपासणीमध्ये जप्त केलेला एकूण ४२८.४६ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा १२८.४६ क्विंटल साठा अतिरीक्त असल्याचे आढळून येते. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक यांनी साठवणूकीच्या विहित कमाल मर्यादेचे उल्लंघन करुन त्यांनी खाद्यतेलाची १२८.४६ क्विंटल साठ्याची अतिरिक्त खरेदी व साठवणूक केल्याचे सिध्द होत आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी तपासणी पथकाने धाडीच्या वेळी घटनास्थळी गोदामात असलेल्या टाकी क्र. १, २, ३, ५ व ६ मधील खाद्यतेलाच्या साठ्याचे नमूने घेवुन ते पृथःकरणासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे,

मुंबई यांचेकडे पाठविण्यात येवुन जप्त खाद्यतेलाचा साठा हा मानवीय खाण्यास योग्य आहे किंवा कसे ? याची खातरजमा करण्यात आली असता अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या पृथ:करण अहवालामध्ये "and I am of the opinion that above samples No C-11 and C-71 confirm to the standards of Sunflower Oil and C-83, C-94 and C-22 does not confirm to the standards of Sunflower Oil as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011 with respect to above parameters", असे नमूद आहे.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज यांच्या नमूद गोदामात तपासणीच्या वेळी पथकाने घटनास्थळी विविध क्षमतेच्या पॅकींगमधील डब्यांमध्ये शेंगदाणा तेल, तीळ तेल, सनफ्लॉवर तेल व खोबरेल तेल या खाद्यतेलाचा साठा जप्त केला आहे. तथापी, गोदामातील टाक्यांमध्ये केवळ सनफ्लॉवर तेल असल्याचे साठा मालक यांनी पंचासमक्ष सांगितले आहे. उपरोक्त नमूद अन्न व औषध प्रशासन विभाग यांनी सादर केलेल्या पृथ:करण अहवालाचे अवलोकन करता, एकूण ५ नमून्यांपैकी ३ नमूने हे does not confirm to the standards of Sunflower Oil as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011 with respect to above parameters", असे नमूद आहे. यावरुन मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज चे मालक हे त्यांच्या गोदामात कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये पॅकिंग करुन त्या डब्यांवर शेंगदाणा तेल, तीळ तेल अशी लेबले लावून त्यामधील खाद्यतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून भेसळयुक्त खाद्यतेलाच्या साठ्याची विक्री करुन ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. तसेच मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक हे वरील नमूद धोकादायक पध्दतीचा अवलंब करुन भेसळयुक्त साठ्याचा व्यवसाय कार्यरत ठेऊन जनसामान्याच्या जिवीतास धोका निर्माण करीत असल्याची बाब प्रकर्षाने नमूद करावीशी वाटते. मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक दिलीप जैन यांनी भेसळयुक्त साठ्याचा व्यवसाय करुन गोरगरीब जनतेच्या तथा उपभोक्त्यांच्या जीवीतास धोका निर्माण केल्याने ते गंभीर सामाजिक अपराधाच्या शिक्षेसही पात्र आहेत. सदर गैरकृत्यामुळे मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक यांनी परवानाधारक म्हणुन शासनाची विश्वासार्हता गमावली आहेच याशिवाय त्यांनी सदरचा अवैध व्यवसाय कार्यरत ठेवून इतर संबंधित शासकिय विभागांचीही दिशाभुल केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, मे. आत्मबंधु इंडस्ट्रीजचे मालक दिलीप जैन हे भेसळयुक्त खाद्यतेलाच्या साठ्याचा अवैध व्यवसाय करीत असल्याचे सिद्ध झाल्याने, त्यांचे विरुद्ध फुड सेफ्टी ॲण्ड स्टँडर्डस ॲक्ट, २००६ अंतर्गत कारवाई करण्याकरीता आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, बांद्रा, मुंबई यांचेकडे अलाहिदा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सबब, मे. आत्मबंधु इंडस्ट्रीज यांचा घटनास्थळी जप्त करण्यात आलेला विविध प्रकारचा सुटा तसेच पॅकबंद डब्यांमधील खाद्यतेलाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. ाा २३/२०१३, दिनांक १४/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) या कार्यालयाचे दिनांक ०६/०५/२०१३ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) प्रस्तुत गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला विविध खाद्यतेलाच्या साठ्यापैकी भेसळयुक्त सिद्ध झालेला टाकी क्र. ३, ५ व ६ मधील एकुण १४०.२९ क्विंटल साठा हा शासनजमा करण्यात यावा.

३) जप्त करण्यात आलेला विविध क्षमतेच्या पॅकींगमधील ९३.१४ क्विंटल विविध खाद्यतेलाचा साठा हा उक्त टाक्यांमधुन पॅकींग केला असल्याने सदरचा संपूर्ण भेसळयुक्त साठा हा शासनजमा करण्यात यावा.

४) उक्त शासनजमा करण्यात आलेला विविध खाद्यतेलाचा भेसळयुक्त साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने मानवीय खाण्याव्यतिरिक्त इतर व्यवसायात वापरण्यासाठी प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) प्रस्तुत गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला विविध खाद्यतेलाचा भेसळयुक्त नसलेला टाकी क्र. १ व २ मधील सनफ्लॉवर आईलचा एकूण ३६.९३ क्विंटल व टँकरमधील गोदामात उतरविण्यात आलेला खोबरेल तेलाचा १५८.१० क्विंटल साठा हा शासनजमा करण्यात यावा.

६) उक्त शासनजमा करण्यात आलेला विविध खाद्यतेलाचा भेसळयुक्त नसलेला साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. आत्मबंधू इंडस्ट्रिजचे मालक दिलीपकुमार जयंतीलाल जैन
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकीत पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

३) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता अग्रेषित.

४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.